# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
**मुख्य कार्यालय** : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन, ई-स्क्वेअर जवळ,
अशोक नगर, गणेशखिंड रोड, शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-६९०६७९००, ६९०६७९१८
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

०२
२६/०६/२०२५

जा.क्र. झोपुप्रा/तां-१/भोप्र/मा.क्र.१७६/९८१८/२०२५ दि.२५/०६/२०२५.

## अंशत: भोगवटा प्रमाणपत्र

**वाचा** - १) प्रथम बांधकाम परवानगी (मूळ CC) क्र.१०६९/२०१९ दि.१०/०५/२०१९.
२) सुधारित बांधकाम परवानगी क्र.९५२/२०२०, दि. २७/०८/२०२०.
३) अंशत: भोगवटा प्रमाणपत्र (इमारत क्र.१) क्र.४२२/२०२२ दि.०१/०४/२०२२.
४) विकसक मे. बी.जी.शिर्के कन्स्ट्रक्शन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी प्रा.लि. यांचे दि.०८/०७/२०२४ व दि.२९/०४/२०२५ रोजीचे पत्र.
५) सुधारित बांधकाम परवानगी क्र.१६४८/२०२५, दि. ११/०६/२०२५.

Slum Rehabilitation Authority ★ Technical Department ★ APPROVED ★ Pune-Pimpri-Chinchwad Area

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम ४५ प्रमाणे **मौजे, हडपसर, सि.स.नं.४६३६, ४६३७ (स.नं.१२४/६+७+८) पुणे** येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील इमारतीस या कार्यालयाकडून क्र.झोपुप्रा/तां.१/९५२/२०२० दि. २७/०८/२०२०अन्वये बांधकाम परवानगी देणेत आली आहे. सदरील बांधकाम परवानगी प्रमाणे उपरोक्त वाचा ३ नुसार इमारत क्र.१ मधील काम पूर्ण झाल्याने, सदर इमारतीमधील २९६ सदनिका + ९ दुकाने + Convenience shops ३५ साठी अंशत: भोगवटा पत्र अदा करण्यात आले आहे. उपरोक्त वाचा ५ मध्ये नमूद केलेनुसार क्र.झोपुप्रा/तां.१/१६४८/२०२५, दि.११/०६/२०२५ अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी देणेत आली आहे. सदरील बांधकाम परवानगी प्रमाणे इमारत क्र.२ मधील काम पूर्ण झाल्याने, सदर इमारतीमधील सदनिकांसाठी अंशत: भोगवटा प्रमाणपत्र मिळण्याबाबत विकसक मे. बी.जी.शिर्के कन्स्ट्रक्शन्स टेक्नॉलॉजी प्रा.लि. यांनी उपरोक्त वाचा मध्ये नमूद केले नुसार विनंती अर्ज केलेवरुन खालीलप्रमाणे तपशीलानुसार पुनर्वसन इमारत क्र.२ नुसार अंशत: भोगवटा प्रमाणपत्र खालील प्रमाणे देणेत येत आहे.

**पुनर्वसन इमारत क्र.२- ११२ सदनिका+३७ Convenience shops**

| अ.क्र. | मजले | सदनिका/दुकान क्र. (पुनर्वसन घटक) | एकूण सदनिका/दुकाने |
|---|---|---|---|
| १) | ग्राउंड फ्लोअर | दुकान क्र. Convenience shops १ ते ३७ + सोसायटी ऑफिस + टॉयलेट+ Meter Room | Convenience shops ३७ + सोसायटी ऑफिस + टॉयलेट+ Meter Room |
| २) | पार्किंग मजला | -- | -- |

| | | | |
|---|---|---|---|
| ३) | पहिला | सदनिका क्र. १०१,१०२,१०३,१०४,१०५,१०६,१०७,१०८, १०९,११०,१११,११२,११३,११४,११५, ११६ | १६ सदनिका |
| ४) | दुसरा | सदनिका क्र. २०१,२०२,२०३,२०४,२०५,२०६,२०७,२०८, २०९,२१०,२११,२१२,२१३,२१४,२१५,२१६ | १६ सदनिका |
| ५) | तिसरा | सदनिका क्र. ३०१,३०२,३०३,३०४,३०५,३०६,३०७,३०८, ३०९,३१०,३११,३१२,३१३,३१४,३१५,३१६ | १६ सदनिका |
| ६) | चौथा | सदनिका क्र. ४०१,४०२,४०३,४०४,४०५,४०६,४०७,४०८, ४०९,४१०,४११,४१२,४१३,४१४,४१५,४१६ | १६ सदनिका |
| ७) | पाचवा | सदनिका क्र. ५०१,५०२,५०३,५०४,५०५,५०६,५०७,५०८, ५०९,५१०,५११,५१२,५१३,५१४,५१५,५१६ | १६ सदनिका |
| ८) | सहावा | सदनिका क्र. ६०१,६०२,६०३,६०४,६०५,६०६,६०७,६०८, ६०९,६१०,६११,६१२,६१३,६१४,६१५,६१६ | १६ सदनिका |
| ९) | सातवा | सदनिका क्र. ७०१,७०२,७०३,७०४,७०५,७०६,७०७,७०८, ७०९,७१०,७११,७१२,७१३,७१४,७१५,७१६ | १६ सदनिका |
| | एकूण | ११२ सदनिका+३७ Convenience shops + सोसायटी ऑफिस + टॉयलेट + Meter Room | |

प्रस्तुत प्रकरणी भोगवटा देणेकामी खालील नमूद अटी व शर्तीस अधीन राहून अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

**अटी:-**

१) प्रस्तुत अंशत: भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये केलेले कोणतेही बांधकाम अनाधिकृत समजण्यात येईल आणि त्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ५२ ते ५६ नुसार जरूर ती कार्यवाही करण्यात येईल.

२) अंशत: भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात कोणत्याही वेळेस आढळल्यास दिलेले अंशत: भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

४) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तींचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

५) दि.२०/०६/२०२४ रोजीच्या अग्निशमन विभागाकडील अंतिम ना- हरकत प्रमाणपत्रामधील सर्व अटी / शर्तींचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

६) इमारतीच्या उत्तर व पुर्व बाजूंनी असणारे सामासिक अंतराचे क्षेत्र (All Marginal / open space) कोणत्याही अडथळ्याशिवाय पुर्णपणे खुले आहे.

७) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

८) सदर योजनेसाठी उद्यान विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र योजनेसाठीचे अंतिम भोगवटा प्रमाणपत्र घेणेपुर्वी आवश्यक राहील.

९) विषयांकित योजना रस्तारूंदीकरणाखालील / आरक्षणाखालील क्षेत्र असल्यास म.न.पा. पुणे यांचेकडे हस्तांतरीत करून तसे, उर्वरित टी.डी.आर. मागणीपूर्वी, या कार्यालयास अवगत करावे.

१०) प्रस्तुत गृहनिर्माण प्रकल्पाकरीता सक्षम प्राधिकाऱ्याने पाण्याचा पुरवठा न केल्यास या गृहनिर्माण प्रकल्पातील सदनिका हस्तांतरण करणेपूर्वी पाण्याची आवश्यक ती पुर्तता स्वखर्चाने करणे विकसकावर बंधनकारक राहील.

११) लिफ्टस, STP, Fire hydrant, Generator backup system व Water pumping इ.बाबत विकसकाने त्यांच्या खर्चाने ५ वर्षाकरिता वार्षिक देखभाल करार (AMC) करणे बंधनकारक राहील.

१२) सदर झोपडपट्टी योजनेतील पुनर्वसन सदनिकांचे वाटप, भोगवटापत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांमध्ये सोडतपद्धतीने वितरीत करून घेणे आवश्यक आहे.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या
दि.२४/०६/२०२५ रोजीच्या मान्यतेनुसार

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

सहायक संचालक नगररचना
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत :-

१. विकसक:- मे. बी.जी.शिर्के कन्स्ट्रक्शन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी प्रा.लि.,
७२-७६,मुंढवा,पुणे-४११०३६.
२. वास्तुविशारद :- श्री. प्रेषित अ. बोरसे,१३००, कसबा पेठ, पुणे-११.
३. तहसिलदार,ताबा विभाग, झोपुप्रा, पुणे, यांना माहितीस्तव अग्रेषित.
४. संगणक अधिकारी यांना संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यासाठी अग्रेषित.